‘मधुक्रांती-२०२०’



# बसवंत मधमाशी उद्यानात प्रशिक्षणार्थींची मांदियाळी

# ‘द्राक्ष’पंढरीमध्ये उभारली ‘मधु’पंढरी

## होतकरू युवक आणि शेतकरी व्हावा उद्योगदिंडीतला वारकरी



**संजय पवार**
कार्यकारी संचालक,
पूर्वा केमटेक प्रा.लि.

अभियांत्रिकीचं उच्च शिक्षण म्हणजे शास्त्रकाट्याच्या कसोटीशी रोजची साथसंगत. या वैज्ञानिक अभ्यासाची फलश्रुती अर्थातच कल्याणकारी जीवन व्यवहारामध्ये. अभ्यासपूर्वक उभारलेली भौतिक सामग्री अंतिमत: माणसाच्या सुखावह चरितार्थासाठी; म्हणजेच व्यापक अर्थाने जैविक स्वास्थ्यासाठीच असते. शिक्षणातून अंगी बाणवलेलं हे सुजनत्व अर्थार्जनाचं लोकार्थाशी असलेलं अतूट नातं अधोरेखित करतं.

याच विचारधारेला अनुसरून, मूठभर घेऊन रानभर देणाऱ्या मातीचा स्निग्ध संस्कार विद्यार्थिदशेतच लाभलेले ‘पूर्वा केमटेक प्रा.लि.’चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांनी, आपल्या तांत्रिक ज्ञानाची गुंतवणूक खत-औषधांच्या कृषिनिविष्ठांमध्ये केली. तद्नंतर या माध्यमातून साधलेल्या पीकवृद्धीतून शेतकऱ्यांचा वाया जाणारा कृषिमाल प्रक्रिया करून टिकाऊ- विकाऊ व्हावा, यासाठी पाऊल उचलले. आता तर मधमाशीच्या रुपातली जैविक संपदा निसर्गस्नेही अशा उद्यमशीलतेसाठी सत्कारणी लावण्याचा संकल्पही त्यांनी यशस्वी केला आहे.

- या संदर्भात ‘पूर्वा कृषिदूत मासिका’चे संपादक तथा ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम’चे टेक्निकल डायरेक्टर डॉ.श्री. भास्कर गायकवाड यांनी श्री. संजय पवार यांची घेतलेली ही विशेष मुलाखत.

**■ आपण ‘पूर्वा केमटेक प्रा.लि.’ या कंपनीची २६ वर्षांपूर्वी स्थापना केली. त्या काळात अभियांत्रिकीचे उच्च शिक्षण घेऊनही कृषिनिविष्ठांच्या उत्पादन क्षेत्रात आलात, याबद्दल काय सांगाल?**

–शेतीशिवाराच्या संदर्भातल्या ज्ञानविज्ञानाचे गुरूकुल असलेल्या राहुरी कृषी विद्यापीठाच्या वातावरणात बालपण गेले. त्यामुळे कृषी क्षेत्राशी परिचय आणि साहजिक म्हणावी अशी आवड लहानपणापासूनच होती. तेथे होणाऱ्या विविध कृषिविषयक घडामोडी, संशोधन व प्रशिक्षण यामुळे कायमच लक्ष कृषी क्षेत्राकडे होते. इंजिनीअरिंगची पदवी घेतली तरी कृषी क्षेत्राचे आकर्षण काही कमी होत नव्हते, त्यामुळे या क्षेत्रात यायचे ठरवले.

**■ आपण १० वर्षांपूर्वी ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.’ या कंपनीचीही स्थापना केली. या नव्या नियोजनामागे नेमका कोणता उद्देश होता?**

–२०१० पर्यंत ‘पूर्वा केमटेक’चे शेतकऱ्यांना उपयुक्त ठरणाऱ्या कृषी निविष्ठा (ॲग्रो इनपुट ) उत्पादनांचे चांगले नेटवर्क तयार झाले होते. संपूर्ण महाराष्ट्रात ‘पूर्वा’ची उत्पादने वितरित होत होती. या दरम्यान, नाशवंत असलेली फळे आणि भाजीपाला पिके टिकवणक्षमता- प्रक्रियेअभावी प्रसंगी कवडीमोल ठरत असल्याचे दिसत होते. म्हणून मग आपल्यापरीने हे चित्र थोडेतरी बदलण्याचा प्रयत्न करण्यासाठी, कृषिमालाच्या प्रक्रियेबाबत अभ्यास केला. शेतकरी प्रचंड कष्टाने, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सोन्यासारखी फळे, भाजीपाला तयार करतात मात्र भाव

मिळत नसल्यामुळे हा माल बऱ्याच वेळा फेकून द्यावा लागतो. नाशिक जिल्ह्यात होणाऱ्या द्राक्ष, डाळिंब, टोमॅटो, कांदा आणि पेरु या पिकांबाबत हे जास्त प्रकर्षाने जाणवले. सगळीच फळे व भाजीपाल्यावर काम करणे अवघड होते. म्हणून द्राक्ष, डाळिंब, टोमॅटो आणि पेरु या चार पिकांवर प्रक्रिया करायचे ठरवले. दहा वर्षांपूर्वी बेदाणा हा ब्रॅण्ड विकसित करून विकणे फारसे प्रचलित नव्हते. मात्र आता शहरी तसेच तालुका पातळीवर **'बसवंत बेदाणा'** हा ब्रॅण्ड ग्राहकप्रिय झाला आहे. विशेषत: कृषिप्रक्रिया केलेली उत्पादने ब्रॅण्ड करून विकणे हे तितके सोपे नाही. मात्र शेतकऱ्यांनी आपल्या कृषी उत्पादनांचे ब्रॅण्डिंग करून विकण्याची वेळ आली आहे हे निश्चित.

**■ 'बसवंत' हा ब्रॅण्ड तयार करत असताना आपण 'बसवंत मधमाशी उद्याना'ची संकल्पना मांडून एक नाविन्यपूर्ण असे मधमाशीचे गार्डन तयार केले. मधुमक्षिका पालनाला प्रोत्साहन देण्याची, त्यादृष्टीने सक्रिय प्रयत्न करण्याची ही विचारधारा कशी विकसित झाली?**

–मधमाशी हा पृथ्वीतलावरील एक अत्यंत परोपकारी कीटक आहे. मधमाशीचा जीवनक्रम हा अत्यंत आश्चर्यकारक असून मानवजातीच्या उन्नतीसाठी मधमाशीचे कार्य खूप महत्त्वाचे आहे. शालेय जीवनात आपल्याला मधमाशीची प्राथमिक ओळख होते. फुलांमधील रस शोषून ती मध तयार करते आणि परागीभवनात मदत करते इतकी प्राथमिक माहिती आपल्याला सुरुवातीच्या काळात मिळते. मधमाश्यांची आगळी वेगळी जीवनशैली, त्यांची संघटित होऊन काम करण्याची पध्दत तसेच राणीमाशीच्या सलग दोन–तीन वर्षे दररोज १००० पेक्षा जास्त अंडी देण्याच्या अद्भुत प्रजनन क्षमतेमुळे एकंदरीत सर्वांनाच मधमाशीबाबत कुतूहल निर्माण होते. पुढील पारंपरिक शिक्षणात मात्र मधमाशी पुस्तकातून दिसेनाशी होते! पुढे कृषिशास्त्राचा किंवा कीटकशास्त्राचा अभ्यास करताना काही जणांची पुन्हा एकदा मधमाशीशी भेट होते. काही जणांना मधमाशीबाबत उत्सुकता निर्माण होऊन ते या क्षेत्रात काम सुरु करतात. परंतु याबद्दल जास्त काम आज तरी महाराष्ट्रात झालेले दिसत नाही. बऱ्याच पुस्तकांत किंवा लेखांमध्ये आपल्याला जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट



आइन्स्टाईन यांचा एक संदेश वाचायला मिळतो. तो संदेश असा आहे की, जर मधमाशी या पृथ्वीतलावरून संपली तर अवघी जीवसृष्टी पुढील चार वर्षांत संपुष्टात येईल. आता पृथ्वीतलावरून मधमाशी लगेचच संपेल आणि लगेचच मानवजात संपुष्टात येईल, असे होणार नसले; तरी या संदेशाचा अर्थ जीवसृष्टीच्या अस्तित्वाबद्दल निर्णायक ठरणाऱ्या मधमाशीच्या कार्याच्या संदर्भात महत्त्वाचा आहे.

मधमाशीचे हे महत्त्व सर्वांना ठावूक असूनही, मधमाशी पालनातील काही क्लिष्ट गोष्टींमुळे महाराष्ट्रात मधमाशीचा म्हणावा तसा प्रसार झालेला नाही हे लक्षात घेता, एक छोटासा प्रयत्न म्हणून आम्ही पिंपळगाव बसवंत येथे 'बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्र' सुरू केले. अशा प्रशिक्षण केंद्राची कल्पना डॉ. तुकाराम निकम सरांनी या संदर्भात बोलताना सुचवली होती.

आता द्राक्षाचा आणि मधाचा गोडवा 'एकमेकांची गोडी' वाढवत आहेत. पिंपळगाव येथे असणाऱ्या प्रचंड द्राक्षबागा व त्यावर होणाऱ्या विविध प्रकारच्या औषध फवारण्यांमुळे या ठिकाणी मधमाशी पालन व प्रशिक्षण केंद्र तग धरू शकेल का, याबाबत सुरुवातीला शंका होती. मात्र असे ठरले की आपली ॲपियरी ही थोडी नैसर्गिक फुलोरा असलेल्या जागेत ठेवून काम सुरू करावे. त्यानुसार आम्ही जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने दि. ५ जून २०१९ रोजी बसवंत मधमाशी उद्यानाची सुरुवात केली. वर्षभरात या केंद्रातर्फे शेतकऱ्यांमध्ये मधमाशीबाबत जागरूकता करण्याचे काम यशस्वीपणे पूर्ण केले व करत आहोत.

**■ आपण मागील दीड वर्षापासून प्रामुख्याने मधमाशी पालन प्रशिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात काम सुरू केले आहे. या संदर्भात आपली भूमिका काय?**

–आपल्याकडे मधमाशीच्या व्यापक उपयोगितेबद्दल अजूनही म्हणावी तशी जागरूकता झालेली नाही. बऱ्याच जणांचा असा समज आहे की मधमाशी पालन हे फक्त मध मिळवण्यासाठी केले जाते. हे तितकेसे बरोबर नाही. मधमाशीपासून आपल्याला मध, मेण (बी-वॅक्स), पराग (पोलन), राजान्न (रॉयल जेली), प्रोपोलिस तसेच हनी बी व्हेनम (मधमाशीचे विष) असे विविध पदार्थ मिळत असतात.

मात्र त्यापेक्षा मधमाशीचे जे अधिक महत्त्वाचे कार्य आहे, ते परागीभवन करणे. जगातील ७० टक्के पिके ही परपरागीभवनावर अवलंबून असतात. परागीभवन झाले नाही तर उत्पादनामध्ये घट येते. मात्र याच उत्पादनात परागीभवन झाल्यानंतर ३० ते ३०० टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. महाराष्ट्रात परागीभवनावर अवलंबून असलेली अनेक पिके आहेत. त्यातील महत्वाची फळपिके म्हणजे डाळिंब, आंबा, संत्री, मोसंबी, पेरु. त्याचप्रमाणे कांदा, टरबूज, खरबूज, शेवगा तसेच तेलवर्गीय पिके व अनेक प्रकारचा भाजीपाला हा परागीभवनावर अवलंबून असतो.

महाराष्ट्रात अनेक कारणांमुळे मधमाशीचे अस्तित्व धोक्यात आले असून, बऱ्याच भागातून मधमाशी नष्ट झाली आहे. त्यामुळे पिकांमध्ये परागीभवन योग्य रीतीने होत नाही व कृषी उत्पादन कमी मिळते. अशावेळी एपिस मेलिफेरा व एपिस इंडिका सिराना (सातेरी) या दोन प्रकारच्या पाळीव मधमाश्यांच्या साहाय्याने परागीभवन करणे हा एक लाभकारक उपाय आहे. फुले लागण्याच्या काळात एकरी एक ते दोन मधमाशी पेट्या शेतात महिनाभर ठेवल्यास उत्तम परागीभवन होऊन उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढते. हा सर्व प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणावर होण्याची गरज आहे व त्यासाठी **'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्र'** नियोजनपूर्वक काम करत आहे. यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येत असतात.

**■ मधमाशी पालनातून मधनिर्मिती हा केवळ एकच उद्देश या व्यवसायातील अनेकांसमोर असतो. आपण मात्र या व्यवसायाचा समग्र विचार करीत आहात, हे स्वागतार्ह आहे. कृषी उत्पादकता, मधमाशी पालनातून रोजगार निर्मितीच्या संधी अशा अनेक बाबींकडे आपण लक्ष पुरवीत आहात. याबद्दल तपशीलवार सांगितल्यास संबंधित सर्वांना ते मार्गदर्शक ठरेल.**

–मधासोबतच इतर अनेक उत्पादने मधमाशीपासून आपल्याला मिळत असतात हे सांगितलेच आहे, आपण सध्या फक्त महाराष्ट्राचा विचार करू. महाराष्ट्रात दोन स्तरांवर मधमाशीपालन यशस्वी होऊ शकते. त्यातील पहिला भाग म्हणजे परागीभवन सेवा आणि दुसरा भाग म्हणजे मध उत्पादन. परागीभवनाबाबत जर आपण हिमाचल प्रदेशचा अभ्यास केला तर खूप काही शिकता येईल. सफरचंदाच्या परागीभवनासाठी हिमाचल प्रदेशमध्ये सुमारे ५०,००० मधमाशी कॉलनी वापरल्या जातात. सफरचंद लागवडीखाली हिमाचल प्रदेशात अंदाजे एक लाख हेक्टर जमीन आहे. या परागीभवन सेवेमुळे हिमाचल प्रदेशमधील सफरचंदाच्या उत्पादनामध्ये खूप सकारात्मक परिणाम दिसले आहेत. अशाच प्रकारची परागीभवन सेवा महाराष्ट्रात खूप फायदेशीर ठरू शकते.

जर आपण महाराष्ट्रातील फळबागांचा विचार केला तर अंदाजे पाच लाख हेक्टर फळबागा महाराष्ट्रात असतील. या एकूण क्षेत्रासाठी अंदाजे २ ते ३ लाख मधमाशी कॉलनी परागीभवनासाठी आवश्यक आहेत. आपण या अंतर्गत भाजीपाला, डाळी, तेलबिया क्षेत्रांचा विचार केलेला नाही. जर आपण हे गणित देखील केले, तर मधमाशी कॉलनींची आवश्यकता १ दशलक्षाहून अधिक असेल. प्राथमिक माहितीनुसार परागीभवन सेवेसाठी कमीत कमी २ लाख मधमाशी वसाहती आवश्यक असतील. सध्या महाराष्ट्रात जवळपास मधमाश्यांच्या २५,००० कॉलनी उपलब्ध आहेत. यावरून आपल्या लक्षात येते की, मधमाश्यांच्या वसाहतींची संख्या वाढवण्याची चांगली संधी आहे.

आज मधमाशी कॉलनीचे मासिक भाडे सुमारे १,५०० रुपये आहे. मधमाशी वसाहतींची संख्या वाढल्यास मासिक भाडेही कमी होऊ शकेल. हे भाडे कमी झाल्याने शेतकरी परागीभवन सेवा घेण्यास प्रोत्साहित होतील.

आता मध उत्पादनाला महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या संधीचा विचार करू. मध तयार करण्यासाठी मधमाश्यांना अधिक प्रमाणावर फुलोरा आवश्यक असतो. तो दोन प्रकारे उपलब्ध होऊ शकतो. पहिला नैसर्गिकरित्या जंगलामध्ये उपलब्ध असलेला व दुसरा शेतकऱ्यांनी लावलेल्या विविध प्रकारच्या पिकांमध्ये उपलब्ध असलेला. या दृष्टीने महाराष्ट्रासाठी सूर्यफूल वरदान ठरू शकेल.

महाराष्ट्रात तीनही हंगामात येऊ शकणाऱ्या व मधमाशीपालनासाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या सूर्यफूल, बाजरी, मका, तूर, शेवगा आणि आवळा या सहा पिकांवर जर लक्ष केंद्रित केले तर त्याचे फलदायी परिणाम समोर येणार आहेत.

प्रत्येक विभागात घेतल्या जाणाऱ्या पिकांसोबतच या पिकांची लागवड जर योग्य नियोजन करून केली तर मधमाशीपालन यशस्वी होईल. मधमाशीमुळे होणाऱ्या परागीभवनामुळे इतर पिकांच्या उत्पन्नात मोठी वाढ होणार आहे. वरील सहा पिकांवर कीटकनाशकांच्या जास्त फवारण्या होत नसल्यामुळे मधमाश्यांना ते पूरकच असणार आहे. गावागावांत तरुण शेतकरी एकत्र आले तर मधाच्या उत्पादनासोबतच सूर्यफुलाच्या तेलाचे लघुउद्योग सुरू करता येतील. सूर्यफुलापासून तयार होणाऱ्या मधाला परदेशात मोठ्या प्रमाणावर मागणी आहे कारण या मधाचे लवकर स्फटिकीभवन होते व अशा मधाला पाश्चिमात्य देशात 'स्प्रेड हनी' म्हणून मोठी मागणी असते.

त्याचप्रमाणे सुशिक्षित बेरोजगार तरुणांना या क्षेत्रात मोठी संधी उपलब्ध होणार आहे. मधमाशीपालन ग्रामीण भागात व विशेषतः जंगल असलेल्या डोंगराळ भागात यशस्वी होऊ शकते. गाव पातळीवर जर काही तरुणांनी एकत्र येऊन व योग्य ते प्रशिक्षण घेऊन मधमाशीपालन सुरू केले तर गावाचे अर्थकारण सुधारू शकेल. मधाच्या उत्पादनासोबतच परागीभवन सेवा सुध्दा या तरुणांना सुरू करता येईल. एकंदरीतच मधमाशी पालनामुळे ग्रामीण भागात सुशिक्षित बेरोजगार तरुणांना मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

**■ उत्तर भारताच्या तुलनेत आपल्याकडे मधमाशी पालन फारच मागे राहिले आहे, याची कारणे काय आहेत?**

–देशाच्या तुलनेत जर विचार केला तर आपण मधमाशी पालनाबाबत बरेच मागे आहोत हे निश्चित. त्यामागे अनेक कारणे आहेत. सर्वत्र उपलब्ध नसणारा

फुलोरा, मधमाशीबाबत मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण तसेच त्याचा प्रचार व प्रसार यांचा अभाव, मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या कीटकनाशकांमुळे मधमाश्यांना असलेला धोका या व इतर काही कारणांमुळे महाराष्ट्रात अजून म्हणावे तसे मधमाशी पालन सुरू झालेले नाही. मधमाशी पालन करताना फुलोरा असलेल्या विविध राज्यांमध्ये मधमाश्यांचे स्थलांतर करावे लागते. यासाठी आपल्याकडील तरुण अजूनही तयार नाहीत.

या सर्व पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात मधमाशी पालनासाठी तरुणांना आकर्षित करणे खूप आवश्यक आहे. तसे बघितले तर हा कमी भांडवलावर सुरू करता येणारा व्यवसाय आहे. याला सर्वात जास्त आवश्यकता आहे ती प्रशिक्षण व प्रत्यक्ष अनुभवाची. ग्रामीण भागातील तरुणांना मधमाशीपालनात प्रशिक्षित करणे हाच उद्देश 'बसवंत मधमाशी प्रशिक्षण केंद्रा'चा आहे.

**■ मधमाशी पालन व्यवसाय महाराष्ट्रामध्ये पुढे घेऊन जाण्यासाठी 'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा'तर्फे सध्या कोणकोणते उपक्रम सुरू आहेत?**

–'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा'तर्फे प्रत्येक बुधवारी प्रशिक्षण आयोजित करण्यात येत असते. त्यामध्ये काही प्रशिक्षण अभ्यासक्रम एक दिवसीय, काही तीन दिवसीय तर काही पाच दिवसांचे असतात. नाममात्र शुल्क आकारले जाते. गरजू विद्यार्थ्यांना व शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण दिले जाते.

विविध कृषी विद्यालये व महाविद्यालांमधील विद्यार्थ्यांना या ठिकाणी बोलावून प्राथमिक प्रशिक्षण दिले जाते. अभिमानाने नमूद करण्याची बाब म्हणजे, मधमाशी पालन क्षेत्रात योगदान दिलेले अनेक मान्यवर आमच्या सोबत शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी सदैव तयार असतात. कृषी क्षेत्रात शिकणारे विद्यार्थी व ग्रामीण भागातील तरुण यांनाच डोळ्यासमोर ठेवून आम्ही प्रशिक्षण कार्यक्रम तयार केले आहेत कारण हेच तरुण पुढील काळात मधमाशी पालन यशस्वीपणे करू शकतील.

**■ मागील वर्षी आपण राज्यस्तरीय 'मधुक्रांती परिसंवाद' आयोजित केला, यावर्षीही हा उपक्रम आहे. यामागचा आपला नेमका उद्देश काय आहे?**

–मागील वर्षी डिसेंबर महिन्यात आपण एक राज्यस्तरीय परिसंवाद आयोजित केला होता. आपल्या राज्यात मधमाशी पालन व त्या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व मान्यवरांना एकाच व्यासपीठावर आणण्याचा हा एक प्रयत्न होता, तसे झालेही. या क्षेत्रात जे काही लोक काम करतात त्यांची संख्या आपल्याकडे त्या मानाने खूप कमी आहे. यापैकी जास्तीत जास्त लोकांना एकत्र आणण्यासाठी **'मधुक्रांती-२०१९'** या व्यासपीठाचा उपयोग झाला. अजूनही काही लोक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात काम करत आहेत. त्यांना एकत्र आणण्यासाठी या वर्षी सुध्दा आपण **'मधुक्रांती-२०२०'** हा परिसंवाद आयोजित केला आहे. यावर्षी कोरोनाच्या पाश्वर्भूमीवर आपण हा उपक्रम ऑनलाईन माध्यमाद्वारे (वेबिनार) करत आहोत.

जास्तीत जास्त लोकांनी मधमाशी पालन या क्षेत्रात एकत्र येऊन काम करावे व त्या माध्यमातून महाराष्ट्रात मधमाशी पालनाला एक व्यापक स्वरूप यावे हाच आमचा प्रयत्न आहे.

उत्तम प्रकारची पर्यावरणीय अनुकूलता लाभलेल्या काही प्रगत पाश्चात्य राष्ट्रांच्या बरोबरीने; मध्यपूर्वेतले इस्त्राईलसारखे प्रतिकूल निसर्गमान असलेले देशही मधु-व्यवसायाचं व्यापक महत्त्व जाणतात. आपली भारतीय प्राचीन ग्रंथसंपदाही मधमाशीच्या असामान्य सृष्टिसाहचर्याचा दाखला देते. या पार्श्वभूमीवर रूढ पुस्तकी शिक्षणात जीव घुसमटलेलं हे 'मोहोळ' प्रात्यक्षिकांच्या 'फलदायी फुलोऱ्या'कडे झेपावणं गरजेचं आहे, असं तीव्रतेनं वाटत होतं. बांधावरून आम्ही साद घातली, आमच्या वावरात आमंत्रण दिलं. या हाकेला मधु-प्रशिक्षणार्थींचा उत्तम प्रतिसाद लाभतो आहे. आमचं हे कार्यक्षेत्र विस्तारत जावं, प्रशिक्षित मधपाळांनी शेतीव्यवसायातली उत्पादन वाढ आणि मधमाशीजन्य पदार्थांच्या विक्रीतून चांगल्या प्रकारे उदरनिर्वाह करीत राहावा हीच अपेक्षा. ■